# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.१२/ २०१४** **दिनांक ०७.०८.२०१४**
**स्थळ- जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर** **वेळ- दुपारी ०३.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा गुरुवार दिनांक ०७.०८.२०१४ रोजी दुपारी ०३.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ २२४४/ २०१४, दिनांक ०७ ऑगष्ट, २०१४ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा गुरुवार दि. ०७.०८.२०१४ रोजी दुपारी ०३.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे मा.अध्यक्ष श्री.शशिकांत कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.शशिकांत कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.श्री.अनिल कवडे, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्य
०३. मा.श्री.कुंदनकुमार सोनवणे, कार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन, मा.अध्यक्ष श्री.शशिकांत कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

यानंतर विषय पत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरू करणेत आली.

**विषय नं.०१** **दिनांक ०३.०८.२०१४ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.**
**निर्णय क्र.६६२** **सदरहु विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.**

---

**विषय नं.०२** **श्री साईनाथ रुग्णालय इमारतीच्या पश्चिमेकडील भागात पेव्हिंग ब्लॉक बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद :-

अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

मा. व्यवस्थापन समिती निर्णय:- मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १२/०६/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र. ४७८.

प्रस्ताविक:- श्री साईनाथ रुग्णालय आवारात जवळ जवळ सर्वच ठिकाणी पेव्हिंग ब्लॉक बसविल्यामुळे रुग्णालयातील रुग्ण/ नातेवाईकांकरीता चांगली सोय करण्यात आली आहे. परंतू रुग्णालय इमारत नं. ०२ चे पश्चिमेकडील पेव्हिंग ब्लॉक बसविणे बाकी आहे. सदरहू मोकळ्या जागेत सर्वत्र झाडांची सावली असल्याने तेथे रुग्णालय येणारे रुग्णांचे नातेवाईक विश्रांतीसाठी थांबत असतात. करीता सदरहू जागेवर अर्ध्याभागात पेव्हिंग ब्लॉक बसविलेस रुग्णांचे नातेवाईकांची सोय होईल व रुग्णालया समोरील गर्दी कमी होणेस मदत होईल.

प्रस्ताव :- श्री साईनाथ रुग्णालय इमारतीचे पश्चिमेकडील अर्ध्या भागात ८५० चौ. मिटर एम. २० ग्रेडचे ८० एम. एम. जाडीचे लॅकर फिनिश पेव्हिंग ब्लॉक बसविणेकामी सन २०१३-२०१४ चे जिल्हा दरसूचीनुसार अंदाजपत्रक तयार करणेत आले असून, त्यानुसार रु.९,१७,०६३/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

विभागाचा अभिप्राय :- श्री साईनाथ रुग्णालयामध्ये येणारे रुग्ण व रुग्णांची रुग्णालयासमोर होणारी गर्दी कमी होणेचे दृष्टीने तसेच रुग्णांचे नातेवाईक यांचे सोयीसाठी सदरहू मोकळ्या भागात पेव्हिंग ब्लॉक बसविणे योग्य होईल असे मत आहे.

तरी याकामी येणारे रु.९,१७,०६३/- मात्रचे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने निविदा मागवून करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६६३ उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालय इमारतीच्या पश्चिमेकडील भागात पेव्हिंग ब्लॉक बसविणेकामी विहित पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.९,१७,०६३/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०३ प्रसाद लाडू विक्री काऊंटरसाठी ०४ बंदिस्त ॲल्युमिनीअम कॅबीन्स व कॉम्प्युटर टेबल्स तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूदः- अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट- कलम (१) च्या खंड (क) अन्वये मंदिराची व विश्वस्त व्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करण्याची तरतूद आहे.

प्रस्तावः- संस्थानचे कॅन्टीन विभागामार्फत जुने प्रसादालय नं. २ चे उत्तर बाजुकडील हॉलमधून लाडू कांउटरव्दारे साईभक्तांना प्रसाद लाडुची विक्री करण्यात येते. सदर काउंटरवर भक्तांना तिकीट न देता भक्तांकडून रोख रक्कम घेऊन लाडू प्रसादाचे पाकीटे दिले जातात. साईटेक प्रकल्पांतर्गत प्रसाद लाडू विक्रीचे ठिकाणी काउंटरवर संगणक बसविण्यात यावे व संगणक प्रणालीव्दारे प्रथम भक्तांना तिकीट देवून त्यानंतरच प्रसाद लाडू देण्यात यावा असे निर्देश देण्यात आले आहेत. परंतू प्रसाद लाडू विक्रीसाठी असलेला हॉल मोकळा असून बाजुने धुळीचे कण हॉलमध्ये येतात तसेच सर्व काऊंटरवर तेलकटपणा असलेने प्रथम सर्व चारही काऊंटरवर संगणक संचासाठी बंदिस्त कॅबिन तयार करुन प्रत्येक केबिनमध्ये ड्रॉवरची व केबिनला लॉक करणेची सुविधा असावी असे कॅन्टीन विभाग यांनी कळविले आहे. याकामी इकडील विभागामार्फत समक्ष पहाणी करुन मोजमापे घेतली असून सदर ठिकाणी अल्युमिनीअम पार्टीशन व कॉम्प्युटर टेबल करणेसाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| Sr.No | Description | Qty | Unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Providing, Supplying and fixing in position anodised extruded aluminium partition | 128.00 | Sq.mt. | 2096.00 | 2,68,288/- |
| 02 | Providing and fixing in position door of required size of anodised aluminium single leed. Shutter door. (page 68.S.No.100) | 08.00 | Sq.mt | 5,931/- | 47,448/- |
| 03 | Providing and fixing in position computer table with drawers. Size – 1500 x 600 mm | 04 | Nos. | 20,000/- | 80,000/- |
| | Total Rs.- | | | | 3,95,736/- |
| | Add 5% contingencies | | | | 19,787/- |
| | Total say Rs. | | | | 4,15,523/- |

तरी प्रसाद लाडू विक्री काउंटरसाठी चार बंदिस्त अल्युमिनीअम (दरवाजांसह) केबीन व कॉम्प्युटर टेबल तयार करणेकामी उपरोक्त प्रमाणे अंदाजे रु.4,15,523/- मात्रचे खर्चास तसेच सदरचे काम करणेसाठी वर्तमानपत्रातील जाहिरातीद्वारे सिलबंद निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६६४ उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, प्रसाद लाडू विक्री काऊंटरसाठी ०४ बंदिस्त ॲल्युमिनीअम कॅबीन्स (दरवाजांसह) व कॉम्प्युटर टेबल्स तयार करणेकामी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.४,१५,५२३/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०४ श्री साईबाबा हॉस्पिटल व साईनाथ हॉस्पिटल येथे लॉड्री व प्रयोगशाळेच्या रसायनीक सांडपाण्यासाठी स्वतंत्र ETP उभारणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूद :- अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट- कलम (१) च्या खंड (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्त व्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करण्याची तरतूद आहे.

प्रस्तावना- मा.वैद्यकीय संचालक, रुग्णालये, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी दि.१८/०६/२०१४ रोजीचे पत्रान्वये महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण (म.प्र.नि.) मंडळाने सन

२०१२ ते २०१५ या कालावधीसाठी दिलेल्या अधिकारपत्रात संस्थानचे दोन्ही हॉस्पीटलसाठी प्रत्येकी ३.०० लाख रु. बँक गॅरटीसह काही नियम व अटींची पूर्तता करणेकामी कळविले आहे. यामध्ये दोन्ही हॉस्पीटलचे प्रयोगशाळेचे व लॉण्ड्रीचे रासायनीक सांडपाणी विल्हेवाट करणेकामी स्वतंत्र Effluent Treatment Plant (ETP) उभारणे तसेच सदर संयंत्राचे कार्यान्वीत केलेले रिपोर्ट प्रत मिळणेबाबत कळविले आहे.

प्रस्ताव :-श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटल लॉण्ड्री व पॅथोलॉजी लॅबकरीता स्वतंत्र ETP उभारणे गरजेचे आहे, असे बायोमेडीकल विभाग, श्री साईबाबा हॉस्पीटल यांनी कळविले आहे. श्री साईनाथ हॉस्पीटल येथील लॉण्ड्री मधून रोज साधारणतः ७००० ते ८००० लिटर रासयनीक सांडपाणी पाणी बाहेर निघते तसेच दोन्ही हॉस्पीटलचे पॅथोलॉजी लॅबमधून प्रत्येकी साधारणतः १००० ते १५०० लिटर रासयनीक सांडपाणी पाणी बाहेर निघते. त्यानुसार लॉण्ड्रीकरीता साधारणतः 10 Cum/day (10 KLD) व दोन्ही हॉस्पीटलचे लॅबकरीता प्रत्येकी 2 Cum/day (2 KLD) क्षमतेचे ETP प्लॅन्ट उभारणे गरजेचे आहे. सदर प्लॅन्ट उभारणेकामी तांत्रीक माहिती तयार करणे, डिझाईन तयार करणे, निविदा तयार करणे, नकाशे तयार करणे इ. कामी या क्षेत्रातील तज्ञ सल्लागार यांची नेमणूक करणे गरजेचे आहे. याकामी प्राथमिक स्वरुपात अंदाजे रु.२,००,०००/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. याकामी नासिक, पुणे, अ.नगर येथील सल्लागारांची माहिती घेऊन त्यांचेकडून प्रस्ताव मागविता येतील.

तरी वरील विषयांकीतकामी या क्षेत्रातील तज्ञ सल्लागार यांची नेमणूक करणेस व त्यांचेकडून ETP चे डिझाईन, ड्रॉईंग, निविदा तयार करुन घेणेस तसेच याकामी येणारे अंदाजे अपेक्षीत रु.२,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६६५** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व साईनाथ हॉस्पिटल येथे लॉड्री व प्रयोगशाळेच्या रसायनीक सांडपाण्यासाठी स्वतंत्र ETP उभारणेसाठी त्याचे डिझाईन, ड्रॉईंग, निविदा वगैरे तयार करुन घेणेसाठी या क्षेत्रातील तज्ञ सल्लागार यांची विहीत पध्दतीने नेमणूक करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०५** **श्री.सुनिल दत्तात्रय राणे, सहाय्यक संपादक, श्री साईलिला, मुंबई कार्यालय यांचे कोर्ट केसबाबत.**

**विषय नं.०६** **तक्रार यु.एल.पी.क्र.२०८/२०११ श्री.सुनिल दत्तात्रय राणे विरुध्द श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी कोर्ट केसची वकील फि व इतर कोर्ट खर्च रु.५०,०००/- चे बीलाबाबत.**

**निर्णय क्र.६६६** **विषय नं.०५ व ०६ वरील चर्चा पुढे ढकलणेत आली.** (कार्यवाही- प्र.कामगार अधिकारी)

---

**विषय नं.०७** **शासकीय अधिकाऱ्यांना निवासासाठी संस्थान निवासस्थान देणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीच्या दि.०७/०७/२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.५९८, "(१) पोलीस इन्स्पेक्टर, शिर्डी पोलीस स्टेशन (२) मुख्याधिकारी, नगरपंचायत शिर्डी (३) तहसिलदार, राहाता यांना निवासासाठी संस्थान निवासस्थाने उपलब्ध करुन देण्यात यावी. मात्र त्यांचेकडून त्यांना शासनाकडून मिळत असलेला प्रतिमहा घरभाडे भत्ता (H.R.A) तसेच नियमाप्रमाणे विद्युतआकार संस्थानमध्ये जमा करुन घेण्यात यावा." असा निर्णय झालेला आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मध्ये संस्थान कर्मचारी निवासस्थाने शासकीय अधिकाऱ्यांना देणेबाबत तरतूद नाही, त्याबाबत संस्थान विश्वस्तव्यवस्थेने नियम केलेले नाहीत. परंतू श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ नुसार, साईभक्तांचे गर्दीचे नियोजन, भक्तांची सेवा, कायदा व सुव्यवस्था राखने संदर्भात ग्रामस्थ / नागरिक व भक्त यांचे सुरक्षितता व समन्वय ठेवणेसाठी मा.व्यवस्थापन समितीच्या दि.०७/०७/२००८ रोजीचे निर्णयान्वये (१) तहसिलदार, राहाता (२)मुख्याधिकारी नगरपंचायत, शिर्डी, (३)पोलीस इन्स्पेक्टर, शिर्डी पोलीस स्टेशन यांना विहीत अटी/ शर्तीनुसार परवानाधारक तत्वाने निवासासाठी संस्थानची निवासस्थाने उपलब्ध करुन देणेत आलेली आहेत/ येत आहेत.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७/०७/२००८ रोजीचे निर्णयास अनुसरुन (१) तहसिलदार, राहाता (२) मुख्याधिकारी नगरपंचायत, शिर्डी, (३)पोलीस इन्स्पेक्टर, शिर्डी पोलीस स्टेशन यांना निवासासाठी संस्थानची निवासस्थाने देणेत आलेली आहेत. त्याच धर्तीवर वेळोवेळी प्रशासकीय मान्यतेने खालील शासकीय अधिकाऱ्यांनाही संस्थान निवासस्थाने उपलब्ध करुन देणेत आलेली आहेत.

१. उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग शिर्डी.

२. उपविभागीय पोलीस अधिकारी, शिर्डी,

३. पोलीस निरिक्षक, वाहतूक शाखा, शिर्डी पोलीस स्टेशन.
४. पोलीस निरिक्षक, साई मंदिर सुरक्षा.
५. राज्य गुप्तवार्ता अधिकारी.

सदर निवासस्थानाचे वापरापोटी सदर अधिकाऱ्यांकडून त्यांना शासनाकडून मिळत असलेला घरभाडे भत्ता (H.R.A) तसेच नियमाप्रमाणे विद्युतआकार संस्थानकडे जमा होत आहे. परंतु मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७/०७/२००८ रोजीचे निर्णयात उपरोक्त पदनामाच्या अधिकाऱ्यांना संस्थान निवासस्थाने उपलब्ध करुन देणे बाबत स्पष्ट उल्लेख नसल्याने प्रशासकीय कामकाजात अडचण निर्माण होत आहे.

तरी आता दि.०७/०७/२००८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे निर्णय क्रं.५९८ निर्णयानुसार (१) तहसिलदार, राहाता (२)मुख्याधिकारी नगरपंचायत, शिर्डी, (३)पोलीस इन्स्पेक्टर, शिर्डी पोलीस स्टेशन या अधिकाऱ्यांव्यतिरिक्त खालील पदनामाच्या अधिकाऱ्यांना

१) उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग शिर्डी.
२) उपविभागीय पोलीस अधिकारी, शिर्डी,
३) पोलीस निरिक्षक, वाहतूक शाखा, शिर्डी पोलीस स्टेशन.
४) पोलीस निरिक्षक, साई मंदिर सुरक्षा.
५) राज्य गुप्तवार्ता अधिकारी. यांना

देण्यात आलेल्या संस्थान निवासस्थानास कार्योतर मान्यता असावी तसेच यापुढे भविष्यात सदर पदनामाच्या अधिकाऱ्यांना उपलब्धतेनुसार निवासासाठी संस्थान निवासस्थाने देणेबाबतचे प्रस्तावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६६७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या पदनामाच्या शासकीय अधिकाऱ्यांना निवासासाठी उपलब्धतेनुसार संस्थान निवासस्थाने देणेत यावी. त्यांना शासनाकडून मिळत असलेला प्रतिमहा घरभाडे भत्ता (H.R.A) व नियमाप्रमाणे होणारा विद्युतआकार संस्थानमध्ये जमा करणेचे अटीवर निवासव्यवस्था उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच या पदनामाच्या अधिकाऱ्याची इतरत्र बदली झाल्यास त्यांचेकडून त्वरीत संस्थान निवासस्थान खाली करुन घेण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.०८** **श्री कोमपेल्ला विश्वम, चैन्नई यांचे मृत्युपत्र फ्लॅट नं.७ जे, अलवारा अपार्टमेंट अगस्तीअर स्ट्रीट सालीमामम, चैन्नई बाबत.**

**प्रस्ताव-** **१)** श्री शिर्डी साई सत्संग ट्रस्ट सालीग्रामम, चेन्नई यांनी दि. ३०/०१/२०१४ रोजी संस्थानला पत्र पाठविले असून सदर पत्राचे सोबत त्यांनी श्री कोमपेल्ला विश्वम यांचे दि. ०७/१२/२०१० रोजीचे will deed ची झेरॉक्स प्रत व खालील प्रमाणे कागदपत्र झेरॉक्स जोडले आहेत.

१) श्री कोमपेल्ला विश्वम यांचा मृत्यूचा दाखला दि. ३०/१०/२०१३.
२) श्री कोमपेल्ला विश्वम यांची पत्नी के. ज्योतीरमया यांचा मृत्यूचा दाखला दि. ०७/०५/१९८५.
३) श्री कोमपेल्ला विश्वम यांची मुलगी के. संगीता हीचा मृत्यूचा दाखला दि. २१/०२/२०१२.
४) खरेदी खत झेरॉक्स व इतर मिळकत कागदपत्र दि. १२/०५/२००३.

श्री कोमपेल्ला विश्वम यांचे दि.०७/१२/२०१० रोजीचे will deed झेरॉक्स (त्यासोबतचे कागदपत्राचे ) अवलोकन केले असता त्यामध्ये खालील बाबी नमुद केलेल्या आहे.

१) त्यांची पत्नी श्रीमती ज्योतीरमया प्रसाद स्वामी या २६/०३/१९८५ रोजी मयात झाल्या आहे. त्यांची एक मुलगी युएसए येथे राहात आहे.
२) ते लेखक असून श्री साईबाबांचे भक्त आहेत, टेलीफील्म मध्ये ते काम करतात, २००६ पर्यंत ते त्यांच्या व्यवसायात कार्यरत होते. श्री शिर्डी साई सत्संग ट्रस्ट नावाचा ट्रस्ट त्यांनी निर्माण केला आहे त्यांचे ते काम पहात आहे.
३) त्यांना वडीलोपार्जीत मिळकत आहे.
४) त्यांचे व्यवसायाचे उत्पंन्नातून त्यांनी फ्लॅट नं. ७ जे, अलवारा अपार्टमेंट अगस्तीअर स्ट्रीट सालीग्रामम, चेन्नई येथे जो फ्लॅट घेतलेला आहे त्यांचे रजिष्टर sale deed नं. २६९८/२००३ दि. १४/०५/२००३ आहे.
५) त्यांचे वय ५९ वर्षे आहे व त्यादृष्टीने त्यांनी हयातीनंतर वाद विवाद नसावेत म्हणन मृत्यूपत्र करण्याचे ठरविले आहे.
६) त्यांनी त्यांची मुम्मीदिवरम, जिल्हा पुर्व गोदावरी येथे जी मिळकत आहे ती त्यांचे मुलीला मृत्यूपत्राने सर्व हक्का निशी दिली आहे.
७) त्यांची सर्व जंगम मिळकत बँकेतील रक्कमा वगैरे त्यांनी मुलीला दिले आहे.

८) त्यांचे राहाते घर फ्लॅट नं. ७ जे, अलवारा अपार्टमेंट अगस्तीअर स्ट्रीट सालीग्रामम, चेन्नई सर्व हक्का निशी श्री साईबाबा संस्थानला दिले आहे.

**२)** श्री शिर्डी साई सत्संग ट्रस्ट सालीग्रामम, चेन्नई यांचे पत्राचे संदर्भात संस्थानचे भूसंपादन विभागाकडे कार्यवाहीसाठी पत्र पाठविण्यात आले होते सदर प्रकरणी उपरोक्त विषयाचे अनुशंगाने संदर्भीय पत्रातील विनंतीबाबत त्यांनी काही त्रुटी काढल्या असून त्या प्रामुख्याने खालील प्रमाणे आहेत व त्याबाबत विधी विभागाचा अभिप्राय.

| भूसंपादन विभागाचा मुद्दा | विधी विभागाचा अभिप्राय |
|---|---|
| मृत्यूपत्रात A-J फ्लॅट असे नोंदलेले आहे. मात्र खरेदी खत हे मोकळ्या जागेचे आहे. खरेदी खता नंतर फ्लॅट मध्ये रुपांतर होणाऱ्या मधल्या गोष्टीची माहिती आवश्यक आहे. | मृत्यूपत्र फ्लॅट बाबत करण्यात आले आहे. त्यामुळे फ्लॅट चे संबंधीत नगरपालीका प्रॉपर्टी कार्ड, पाणी पट्टी यांचे रेकॉर्ड आवश्यक राहील त्यांनी सदर प्रकरणात देवू केलेले फ्लॅट नं. ७ चा उतारा पाठविलेला नाही. जे कागदपत्र हजर केले आहे ते विसंगत आहे. फ्लॅट नं. ७ चे कागदपत्र संबंधीत श्री शिर्डी साई सत्संग ट्रस्ट सालीग्रामम, चेन्नई यांचेकडून मागविता येईल, तसेच श्री शिर्डी साई सत्संग ट्रस्ट सालीग्रामम, चेन्नई यांचे लेटरहेडवर श्री कोमपेल्ला विश्वम यांनी देवू केलेल्या फ्लॅटचा पत्ता दिलेला आहे. त्यांचे कार्यालय सदरचे फ्लॅट मध्ये दिसते सदरचे कार्यालय आहे किंवा काय ? असल्यास त्याबाबत करारमदार झाला आहे किंवा काय संस्थानला फ्लॅट दिल्यानंतर ते दुसरीकडे हलविणार किंवा कसे याबाबत विचारणा करता येईल. |
| श्रीमती कोम्पेल्ला इंदिरा प्रियदर्शनी यांनी दिलेल्या अर्जात त्यात श्री कोमपेल्ला विश्वम यांची पत्नी आहे मात्र दि. २२/१२/२०१३ रोजीच्या पत्रात त्यांनी श्री कोमपेल्ला विश्वम यांची व्दीतीय पत्नी असल्याचे नमुद केले आहे.<br>तसेच त्यांनी पतीच्या निधनानंतर हैद्राबादला गेले असता विषयांकीत फ्लॅट मध्ये काही स्थानिक लोक साईबाबा संस्थानसाठीचे मिळकती मध्ये शिरकाव केला असल्याचे लक्षात आले. त्यांनी याबाबत सदर मिळकतीबाबत मा.कोर्टात कौटूंबीक वाद चालू आहे. त्यामुळे त्यात हस्तक्षेप करु नये अशी त्यांनी विनंती केली आहे. त्यांनी सदरची मिळकत संस्थानला देवून मला त्रास देईल असे त्यांचे पती त्यांना म्हणत असत अशा प्रकारे जर मिळकत संस्थानला दिली असेल तर ती बेकायदेशीर आहे व कायदेशीर नाही. शिर्डी संस्थानने सदरची मिळकत स्विकारु नये कारण सदर मिळकतीबाबत वाद चालू आहे. असे प्रस्तुतचे पत्रात श्रीमती कोम्पेल्ला इंदिरा प्रियदर्शनी यांनी म्हटले आहे. सदरची मिळकत न स्वकारणेबाबत सदर पत्राने त्यांनी संस्थानला विनंती केली आहे. त्याबाबत मा.कोर्टात वाद चालू आहे. त्यांच्या पतीने बऱ्याच बाबी उघड केलेल्या नाहीत. व मला त्रास देण्याच्या हेतूने कायदेशीर मालक म्हणून त्या सदर मिळकतीच्या कायदेशीर वारस आहेत करीता सदर मिळकतीचे संदर्भात पुढील कार्यवाही करु नये असे सदरचे पत्रात नमुद केले आहे. | श्रीमती कोम्पेल्ला इंदिरा प्रियदर्शनी यांचे दि.०९/१२/२०१३ रोजीचे पत्र प्राप्त झाले होते त्यावेळेस त्यांचे पतिचे मृत्यूपत्र प्राप्त नव्हते/ कागदपत्रांची माहिती नव्हती त्यामुळे तसे त्यांना त्यावेळी कळविण्यात आले आहे.<br>आता श्रीमती कोम्पेल्ला इंदिरा प्रियदर्शनी यांचे दि.२२/१२/२०१३ रोजी पत्र प्राप्त झाले असून त्यांचे पतीबाबत माहिती नमुद केली आहे. त्यांचे मध्ये नेहमी भांडणे असत बऱ्याच वेळा भांडणे टोकाला गेली त्याबाबत त्यांच्या उभयतांमध्ये पोटगी केसेस (३७८/२०१२) दाखल झाली त्यांच्या पतीने त्यांना पुष्कळ त्रास दिला त्यांचे पती बाबा होवून हिमालयात जाईल असे म्हणत असत त्यांच्या घराची सामाजीक प्रतिष्ठा राखण्यासाठी त्यांनी मौन बाळगले त्यांचे पती दि.०२/१०/२०१३ रोजी निधन झाले त्यांच्या पतीच्या पहिल्या पत्निपासून झालेल्या मुलाबाबत त्यांना माहिती नाही.<br>मला राहण्यासाठी विषयांकीत फ्लॅट शिवाय घर नाही. सदर घर माझ्या पतीने संस्थानला मृत्यूपत्राने दिलेले आहे. मी भाड्याच्या घरात राहात आहे. मी श्री साईबाबाना सदरचे घर परत देणेबाबत प्रार्थना करत आहे. मी साईबाबांची भक्त आहे. त्यांच्या भक्तांना ते आसरा देतात आसरा काढून घेत नाही. तरी आवश्यक ते ठराव करुन मृत्यूपत्र माझे बाबत रिलीज करण्यात यावे साईभक्ताची पत्नी या नात्याने मला मृत्यूपत्राचे लेखातून मुक्त करण्यात यावे मानवतेच्या दृष्टीकोणातून माझ्या अर्जाचा विचार करण्यात यावा असे प्रस्तुतचे पत्रात नमुद केले आहे.<br>यांनी त्यांचे पत्रात नमुद केलेल्या प्रमाणे मालमत्तेबाबत मा.कोर्टात वाद चालू असल्यास सदरचे वादात निकाल होईपावेतो सदरचा फ्लॅट संस्थानला घेता येणार नाही. तसेच याबाबत सविस्तर माहिती श्री शिर्डी साई सत्संग ट्रस्ट सालीग्रामम, चेन्नई यांना पत्र देवून मागविता येईल. |

उपरोक्त सर्व बाबींवरुन असे लक्षात येते की, मयत साईभक्त श्री कोमपेल्ला विश्वम व त्यांची पत्नी श्रीमती कोम्पेल्ला इंदिरा प्रियदर्शनी व तसेच श्री शिर्डी साई सत्संग ट्रस्ट सालीग्रामम, चेन्नई यांचे आपसात वाद असून काही वाद मा.कोर्टात न्याय प्रविष्ट आहेत. साईभक्त श्री कोमपेल्ला विश्वम यांनी संस्थानला फ्लॅट दिलेला आहे. मात्र मृत्यूपत्राची अंमलबजावणी करीता एक्झीक्युटर नेमलेला दिसून येत नाही. मृत्यूपत्रात नमुद केलेल्या जंगम मिळकतीबाबत कशा पध्दतीने व्यवस्था करण्यात आलेली आहे. याचाही खुलासा केलेला नाही. तसेच मिळकतीचे संदर्भात वाद असल्याचे सकृत दर्शनी दिसून येते.

**विधी विभागाचा स्पष्ट अभिप्रायः-** सदर मिळकत स्विकारणेबाबत श्रीमती कोम्पेल्ला इंदिरा प्रियदर्शनी यांनी व्दितीयपत्नी म्हणून सदर मिळकत संस्थानने स्विकारणेबाबत हरकत घेतली आहे व मिळकत त्यांना मिळणेसाठी सदर हरकत आहे. अशा परिस्थीतीत वादाची मिळकत स्विकारु नये असे मत आहे. तथापी मिळकत संस्थानला स्विकारणेचे संबंधी कायदेशीर सल्ला घेणे उचीत राहील तेव्हा सदर मिळकत संस्थानला स्विकारणे / न स्विकारणेचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६६८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री कोमपेल्ला विश्वम, चेन्नई यांनी त्यांचे मृत्युपत्रामध्ये उल्लेख केलेला फ्लॅट नं.७ जे, अलवारा अपार्टमेंट अगस्तीअर स्ट्रीट सालीमामम, चैन्नई सर्व हक्कानिशी श्री साईबाबा संस्थानला देण्याची तरतूद केलेली आहे. परंतु श्रीमती कोम्पेला इंदिरा प्रियदर्शनी यांनी सदरहू मिळकत संस्थानने स्विकारणेबाबत द्वितीयपत्नी म्हणून हरकत घेतलेली आहे, त्यामुळे उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.** (कार्यवाही- प्र.विधी अधिकारी)

---

**विषय नं.०९** **मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांचे स्टार्टर दुरुस्ती कामाचे बील आदा होणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडीचे सर्व ठिकाणचे इमारती व परीसराकरीता एकुण ९ ठिकाणी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून उच्च दाब वीजपुरवठा जोडून घेण्यात आलेला असून या वीजपुरवठयाचे पर्यायी व्यवस्थेकरीता प्रत्येक ठिकाणी विविध क्षमतेचे जनरेटरसेट बसविण्यात आलेले आहेत. दि.१७-०३-२०१४ रोजी साईनगर येथील सबस्टेशन परीसरातील १०१० केव्हीएचा जनरेटरसेटचा जनरेटरसेट चालू स्थितीत असतांना जनरेटरसेटच्या फ्लायव्हिल जवळून स्पार्क होऊन आवाज येऊ लागल्याने तेथील जनरेटर तारतंत्री कर्मचा-याने १०१० केव्हीएचा जनरेटरसेट बंद करुन वीजपुरवठा त्वरीत स्टँडबाय ५०० केव्हीए जनरेटर व २५० केव्हीए जनरेटरसेट जोडून घेतला.

मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स् अॅण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांना संस्थानचे सर्व ठिकाणचे सन २०१४-१५ या वर्षाचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देण्यात आलेले आहे. मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स् अॅण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांचे इंजिनिअर्स यांनी १०१० केव्हीए जनरेटरसेटच्या दोन स्टार्टरपैकी ०१ नग खराब झालेला स्टार्टर खोलून घेतला व त्याठिकाणी स्पेअर असलेला एक स्टार्टर बसवून १०१० केव्हीए जनरेटरसेट चालू करुन दिला. सदरील स्टार्टर ५०० व १०१० केव्हीए जनसेटकरीता एकसारखा असल्याने दोन्ही प्रकारच्या जनरेटर करीता स्टार्टर वापरता येतो. संस्थानचे विविध ठिकाणांचे ५०० व १०१० केव्हीए जनरेटर मिळून एकुण ११ नग स्टार्टर जनरेटरसेटला कार्यान्वित आहेत. त्यामुळे वेळप्रसंगी एखादया जनरेटरसेटच्या एखादा स्टार्टर खराब होऊन जनरेटरसेट बंद पडल्यास आपणास स्पेअर असलेला स्टार्टर बसवून जनरेटर चालू करुन घ्यावा लागतो. नविन स्टार्टरची किंमत ही रु. १,५०,०००/- इतकी आहे. याकारणास्तव स्पेअर स्टार्टर दुरुस्त करुन घेणे अत्यंत गरजेचे असल्याने जनरेटरसेटचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स् अॅण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांचेकडून स्टार्टर दुरुस्त करुन घेण्यात आला आहे.

मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स् अॅण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांनी स्टार्टर दुरुस्त केल्याचे बील सादर केले असून सदरील बील मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स् अॅण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांना आदा करावे लागणार आहे. बीलाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| SR.NO. | PART NO. | DETAILS | QTY. | PRICE IN RS. | AMOUNT. IN RS. |
|---|---|---|---|---|---|
| 01) | 113000046 | STARTER BRUSH | 01 | 1430.25 | 01,430.25 |
| 02) | 113000048 | BUSHING TVS | 03 | 0612.00 | 01,836.00 |
| 03) | 113000051 | ALLEN KEY BOLT | 01 | 0475.25 | 00,475.25 |
| 04) | 113000057 | TRIPLEX SCREW | 01 | 0455.60 | 00,455.60 |
| 05) | Oth 1163 | CONTACT | 01 | 3120.00 | 03,120.00 |
| 06) | 113000053 | BENDEX DRIVE ASSLY | 01 | 12710.00 | 12,710.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 07) | 113000056 | SELF CLUTCH ASSLY | 01 | 1372.00 | 01,372.00 |
| 08) | A | LABOUR CHARGES FOR THE REPAIRS & CALIBRATION OF STARTER | 01 | 3750.00 | 03,750.00 |
| 09) | B | LABOUR CHARGES – FOR STARTER REMOVAL & INSTALLTION ON ENGINE AND TRAIL | 01 | 7000.00 | 07,000.00 |
| 10) | C | TRANSPORTATION CHARGES OF STARTER FROM SHIRDI TO A BAD AND VICE VERSA | 01 | 1800.00 | 01,800.00 |
| 11) | TOTAL (1 to 7) | 21,399.10 | | | |
| 12) | TOTAL ( 8 TO 10) | 12,550.00 | | | |
| 13) | VAT 12.5 % ON SR.NO.1,2,3,4,6 &7 | 02,674.88 | | | |
| 14) | SERVICE TAX 12.36% ON Sr.No. 8,9,10 | 01,551.18 | | | |
| 15) | TOTAL (11 TO 14) | 38,175.16 | | | |
| 16) | ROUND UP | 38,175.00 | | | |
| | IN WORDS :- RS.THIRTY EIGHT THOUSAND ONE HUNDRED & SEVENTY FIVE ONLY. | | | | |

उपरोक्तप्रमाणे मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स् अॅड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांनी जनरेटरसेटचे स्टार्टर दुरुस्त करुन दिला असून सदरील बील मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स् अॅड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांना आदा करणेकामी मान्यता मिळावी, ही विनंती.

उपरोक्त प्रस्तावावर विचार होऊन मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६६९ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.१० श्री साईनाथ रुग्णालयामधील जुने वॉटरकुलर बायबॅक करुन नवीन खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी करण्यात येईल:- मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

श्री साईनाथ रुग्णालयात रुग्ण व नातेवाईक यांचेसाठी पिण्याचे पाण्याचे व्यवस्थेकरीता ०२ नग वॉटरकुलर बसविण्यात आलेले आहे. परंतू सदर वॉटरकुलर अतिशय जुने असल्यामुळे वारंवार खराब होऊन बंद पडतात. व त्यांची वेळोवेळी दुरुस्ती करण्यात आलेली आहे. मात्र रुग्णांना व त्यांचे नातेवाईकांना पिण्याच्या पाण्याच्या सोईची अडचण निर्माण होऊन ही व्यवस्था अपूरी पडत आहे. त्यामुळे संदर्भीय पत्रान्वये श्री साईनाथ रुग्णालय विभागाने ०२ वॉटरकुलर नविन खरेदी करुन बसविण्यात यावेत अशी मागणी केलेली आहे.

श्री साईनाथ रुग्णालयाचे मागणीनुसार ०२ नविन वॉटरकुलर आवश्यक आहे. मात्र आपणाकडे नविन वॉटरकुलर शिल्लक नसल्याने जुने वॉटरकुलर बायबॅक करुन नविन खरेदी करावे लागणार आहे. तसेच अतिरिक्त ०२ असे एकुण ०४ नग वॉटरकुलर खरेदी करावे लागणार आहे.

**०१). नवीन वॉटरकुलर खरेदी करण्याचा तपशील खालीलप्रमाणे :-**

| अ.क्र. | तपशील | मागणी | दर (अंदाजे) | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | व्होल्टास तुषार/ ब्लू स्टार मेक, वॉटरकुलर क्षमता:- १५० लिटर | ०४ नग. | रु. ६०,०००/- | रु. २,४०,०००/- |
| | | | एकुण :- | रु. २,४०,०००/- |

**२). जुने बायबॅक कराव्या लागणा-या वॉटरकुलरचा तपशील :-**

| अ.क्र. | तपशील | डेडस्टॉक नंबर | खरेदी किंमत व दिनांक | घसारा किंमत |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०१) | व्होल्टास तुषार वॉटरकुलर क्षमता :- १५० लिटर | COL / 5014 रजि.नं.०१ पा.क्र.८४ अ.क्र.५१,५२ | (प्रति नग रु. ३५,७७३/-) दि.०७-०९-२००१ | रु. २,०९६/- |

उपरोक्त प्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयाकरीता जुने वॉटरकुलर बायबॅक करुन नविन वॉटरकुलरची खरेदी ही टेंडर मागवून करावी लागणार आहे. त्याकामी जुन्या वॉटरकुलरची घसारा किंमत वजा करुन नविन वॉटरकुलर खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रु.२,३७,९०४/- मात्र खर्च येणे अपेक्षित आहे.

याकामी संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन तसेच वर्तमानपत्रात जाहिरात देऊन टेंडर मागविणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६७०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयामधील जुने वॉटरकुलर बायबॅक करुन नवीन वॉटरकुलर खरेदी करणेकामी संस्थानचे संकेतस्थळावर व वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करुन टेंडर मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२,३७,९०४/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.११** **साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा येथील प्लंबींग मेन्टेनंस कामांसाठी मटेरीयल खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः- २१ (१) चा (क)- मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांचीदेखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

प्रस्तावना:- श्री साईच्या दर्शनासाठी शिर्डी येथे येणा-या भक्तांना निवासाची सुविधा उपलब्ध व्हावी म्हणून संस्थानमार्फत निवासस्थान इमारतींची उभारणी करण्यात आलेली आहे. ही निवासाची सुविधा मोठया प्रमाणावर व विनासायास उपलब्ध व्हावी म्हणून मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं. १०७, १०८, १०९ पैकी मधील क्षेत्रामध्ये तसेच शिर्डी शहरालगत असलेल्या मौजे निमागांव-को-हाळे ग्रामपंचायत हद्दीतील संस्थान मालकीच्या गट नं. १७२ पैकी मधील जमीनीमध्ये अनुक्रमे साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा या निवासस्थान प्रकल्पाची उभारणी करण्यात आलेली आहे. सदर इमारतीमधील खोल्या/हॉल साईभक्तांना निवासासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

साईआश्रम भक्तनिवासस्थान इमारतीबाबत जा.नं.४५/स्टोअर्स/२०१४, दि. १३ जुलै, २०१४ टिपणी पाणी पुरवठा विभागास प्राप्त झालेली आहे. त्यानुसार त्यांनी साईआश्रम भक्तनिवास इमारतीचे शौचालयातील जेट स्पे व जेट स्प्रे स्टॅंड नादुरुस्त असलेने त्यांचा वापर करता येत नाही. त्यामुळे साईभक्त तक्रारी करतात पर्यायाने साईभक्तांना रुम बदलून दयावी लागत आहे.

तसेच, साई धर्मशाळा इमारतीबाबत तेथील सहा इमारतीमधील एकुण २८८ कमोड टॉयलेट मधील कमोड भांडयांचे जेट स्प्रे व कमोड शिट कव्हर खराब असल्याने ते बदलून त्याजागी नविन टाकून मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

साईआश्रम भक्तनिवास इमारतीबाबत तेथील प्लंबींग मेन्टेनंस करीता पाणी पुरवठा विभागाकडुन दि. १ जुलै, २०१४ व दि. ४ जुलै, २०१४ अन्वये अनुक्रमे ८५ नग जेट स्प्रे व ५५ नग कमोड शिट कव्हर खरेदी करणेस मान्यता घेण्यात आलेली आहे. उर्वरीत आवश्यक जेट स्प्रे व कमोड शिट कव्हर खरेदी करावे लागणार आहे.

प्रस्ताव:- साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा येथील इमारतींचे प्लंबींग मेन्टेनंस बाबतपाणी पुरवठा विभागाकडुन प्रत्यक्ष पाहणी केली असता, उपरोक्त जेट स्प्रे व कमोड शिट कव्हर व्यतिरिक्त इतरही साहित्य बदलविणे गरजेचे आहे. याकरीता खालीलप्रमाणे साहित्य खरेदी करावे लागेल.

| अ.नं. | मटेरियल तपशिल | कंपनी | परिमाण | एकक | अंदाजे दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | जेट स्प्रे (विमान टाईप) (हेवी) (ISI मार्क) | --- | ८५५ | नग | २९०.०० | २,४७,९५०.०० |
| ०२ | कमोड शिट कव्हर (हेवी) आयव्हरी कलर | --- | ५३० | नग | ४५०.०० | २,३८,५००.०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ०३ | सी.पि.व्ही.सी.थ्रेडर- १.१/४" (बाहेरील आटे) | फिनोलेक्स | १६०० | नग | ४८.०० | ७६,८००.०० |
| ०४ | पि.व्ही.सी. थ्रेडर- १.१/४" (आतील आटे) | फिनोलेक्स | ३००० | नग | १८.०० | ५४,०००.०० |
| ०५ | पि.व्ही.सी. टी- १.१/४" | फिनोलेक्स | १६०० | नग | २०.०० | ३२,०००.०० |
| ०६ | पि.व्ही.सी.बंदप्लग- १.१/४" | फिनोलेक्स | १६०० | नग | १०.०० | १६,०००.०० |
| ०७ | पि.व्ही.सी. पाईप- १.१/४" | फिनोलेक्स | ३००० | फुट | १८.०० | ५४,०००.०० |
| ०८ | सी.पि.व्ही.सी.पाईप- १.१/४" | फिनोलेक्स | २०० | फुट | ४५.०० | ९,०००.०० |
| ०९ | टेपलॉन टेप (२० मिटरचे) | --- | ६०० | नग | २२.०० | १३,२००.०० |
| १० | पि.व्ही.सी. सोल्युशन | फिनोलेक्स | ७ | लि. | ५८०.०० | ४,०६०.०० |
| ११ | सी.पि.व्ही.सी. सोल्युशन | फिनोलेक्स | ३ | लि. | २०८८.०० | ६,२६४.०० |
| एकुण खर्च रक्कम- | | | | | | **७,५१,७७४.००** |

विभागाचे स्पष्ट मत/ अभिप्रायः- सदरचे काम करणे आवश्यक असून, याकामी श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ कलम २१ (१) चा (क) मध्ये नमुद केलेल्या तरतुदीनुसार मा.त्रिसदस्यीय समितीची मान्यता घेतल्यानंतर सदरचे पाणी पुरवठा विभागांतर्गत काम करता येईल असे मत आहे.

तरी साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा येथील प्लंबींग मेन्टेनंसचे काम करणेसाठी वरीलप्रमाणे नमुद मटेरियल खरेदी करणेसाठी अंदाजे रु. ७,५१,७७४/- मात्र खर्च अपेक्षित आहे. तरी सदरचे साहित्य विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रु. ७,५१,७७४/- मात्रचे खर्चास मान्यता मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.६७१ यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा येथील प्लंबींग मेन्टेनंस कामांसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे साहित्य विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.७,५१,७७४/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.१२ साईभक्तांना प्रसादभोजन सेवा पुरविणेकामी वाढीव प्रासंगिक कर्मचारी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद** :- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (भाग- ४) मध्ये महाराष्ट्र विधी मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील २१ (१ घ) नूसार भक्तांना जेवण पुरवणे आणि अन्नछत्र चालवणे.

**प्रस्ताविक :-** मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समिती दिनांक १३/१२/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.९६९ अन्वये, साईभक्तांची प्रसादभोजन अभावी गैरसोय होवू नये म्हणून श्रींचे उत्सव, दिपावली, नाताळ अथवा सलग सार्वजनिक सुट्टया, गर्दीचे कालावधीत होणाऱ्या संभाव्य गर्दीचा विचार करता आवश्यकतेनुसार कामगार विभाग, लेबर कॉन्ट्रॅक्टर यांचेकडून कामगार लावणेस अथवा त्यांचेकडून उपलब्ध न झाल्यास स्थानिक केटरर्स यांचेकडून अकुशल कामगार घेणेस व त्यांना किमान वेतन अधिनियम कायद्यानूसार रक्कम आदा करणेस मान्यता मिळालेली आहे.

मा.अध्यक्ष सो.यांचे दि.०२/०७/२०१३ चे दुरध्वनीवरील सुचनेवरुन साईआश्रम भाग-०१ येथे दि.२१/०७/२०१३ पासून प्रायोगिक तत्वावर स्वयंसेवी प्रसादभोजन कक्ष सुरु करण्यात आलेले आहे. प्रसादभोजनास साईभक्तांचा प्रतिसाद चांगला असल्यामुळे येथे प्रसादभोजन सुरु ठेवणे गरजेचे आहे.

इकडील दिनांक ०४/०७/२०१३ रोजीचे मंजूर टिपणीनुसार साईआश्रम भाग-०१ करीता श्री साई प्रसादालय विभागास ५६ कर्मचारी आवश्यक असलेबाबतची टिपणी मंजूर करणेत आलेली असून त्यानुसार कर्मचारी मिळालेले नाही. परंतू साईआश्रम भाग-०१ येथील साईभक्तांना प्रसादभोजन सुविधा पूरविणे गरजेचे असल्याने मुख्य प्रसादभोजन हॉल, साईबाबा भक्तनिवासस्थान स्वयंसेवी प्रसादभोजन कक्ष, साईनाथ रुग्णालय स्वयंसेवी प्रसादभोजन कक्ष व व्ही. आय.पी प्रसादभोजन कक्ष येथील कर्मचारी कमी करुन साईआश्रम भाग-०१ येथे देण्यात येतात. त्यामुळे तेथील साई भक्तांच्या अडचणींना सामोरे जावे लागते.

सध्या प्रसादभोजन सुविधा पुरविण्यात येणाऱ्या सर्वच ठिकाणी कर्मचारी कमी पडत असल्यामुळे साईभक्तांना प्रसादभोजनास विलंब होतो. विलंबाने प्रसादभोजन मिळालेमुळे साईभक्त संस्थान प्रशासनावर नाराजी व्यक्त करतात.

**मागणी :-** १) बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे या लेबर कॉट्रक्टर यांचेकडून जादा कामगार उपलब्ध होऊ शकत नसल्याने साईभक्तांची होणारी गैरसोय दूर करणेसाठी प्रासंगिक कर्मचारी म्हणून, श्रीरामपूर येथील श्री साई केटरर्स यांना वाढपी कामाचा अनुभव चांगला असल्याने त्यांचेमार्फत दि.०१/०४/२०१४ ते दि.३०/०६/२०१४ अखेर ५० वाढपी कामगार घेणेस व त्यांना किमान वेतन दराप्रमाणे वेतन + प्रा.फंड १३.६१% सह त्यांचे कडील कर्मचाऱ्यांची बीलाची रक्कम आदा करणेस मान्यता मिळालेलेली आहे.

२) श्री साईप्रसादालयात हाऊसकिपींग कामाची मुदत दि.३१/०३/२०१४ अखेर संपलेली असून दि.०१/०४/२०१४ पासून पुढील कालावधीसाठी ज्या कंपनीस हाऊसकिपींगचे काम दिले जाईल त्यांना हाऊसकिपीग/ पेस्टकंट्रोल कामाचे निवीदेतील अटी/शर्ती क्रं.५१ मध्ये गर्दीचे काळात संस्थानकडील वाढपी कायम/कंत्राटी कर्मचारी कमी पडत असल्यास निविदाधारकास गर्दीचे प्रमाणात जादा कंत्राटी कर्मचारी मागणीप्रमाणे पुरविणे बंधनकारक असल्याचे नमुद केलेले आहे. याकामासाठी लावणेत आलेल्या जादा कत्राटी कर्मचाऱ्यांची बीलाची रक्कम निवीदाधारकास प्रचलीत किमान वेतन दरानुसार देण्यात येईल असे म्हटलेले आहे.

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार अनुमान :-** आर्थिक

अकुशल वाढपी कर्मचारी लावल्यास सध्याचे किमान वेतन दर + प्रा. फंड(१३.६१%) सह खालीलप्रमाणे खर्च येणार आहे.

| **कर्मचारी संख्या** | **सध्याचा किमान वेतन दरानुसार(२५३.११/-)** | **प्रा. फंड (१३.६१%)** | **एकूण खर्च** |
|---|---|---|---|
| एका कर्मचाऱ्यासाठी | २५३.११/- | ३४.४४/- | २८७.५५/- |
| ५० कर्मचाऱ्यांना एका दिवसासाठी | १२६५५.५०/- | १७२२.४१/- | १४,३७७.९१/- |
| ५० कर्मचाऱ्यांना एका महीन्यासाठी | ३७९६६५.०० | ५१६७२.४०/- | ४,३१,३३७.४०/- |

तरी सध्याचे किमान वेतन दरानुसार ५० अकुशल वाढपी कर्मचाऱ्यांना ०१ महीन्याकरीता अदांजे ४,३१,३३७/- रुपये खर्च अपेक्षीत आहे.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-** तरी उपरोक्त प्रास्तविकनूसार दि.०१/०४/२०१४ पासून पुढील कालावधीसाठीचे हाऊसकीपींग/ पेस्टकंट्रोलचे टेंडर देणेबाबतची कार्यवाही विधी विभागाकडून मा.उच्च न्यायालय (औरंगाबाद खंडपीठ) यांचे मान्यतेसाठी सुरु असल्याने, सध्याचे लेबर कॉन्ट्रॅक्टर मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे,कॅम्प-शिरडी यांचेकडून अकुशल कंत्राटी कर्मचारी उपलब्ध होत नसल्यामुळे सध्या प्रसादालयात काम करीत असलेल्या श्री साई केटरर्स, श्रीरामपूर यांचेमार्फत पूर्वीप्रमाणे दि. ०१/०७/२०१४ पासून पुढील कालावधीसाठी दररोज ५० वाढपी कर्मचारी आवश्यकतेनुसार लावणेस व त्यांना प्रचलीत किमान वेतन दराप्रमाणे वेतन + प्रॉ.फंड (१३.६१%) सह बीलाची रक्कम आदा करणेकामी सदरील विषयाचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन त्रीसदस्य समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.६७२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयामध्ये साईभक्तांना प्रसादभोजन सेवा पुरविणेकामी आवश्यक असणारे प्रतिदिनी ५० वाढीव कंत्राटी कर्मचारी सध्याचे हाऊस किपींग कॉन्ट्रॅक्टर मे.बी.व्ही.जी. इंडिया लि., पुणे या कॉन्ट्रॅक्टरमार्फत आऊट सोर्स पध्दतीने दि.०१.०९.२०१४ पासुन घेण्यात यावे.**

**सदर कंत्राटी कामगारांना किमान वेतन दराप्रमाणे वेतन + प्रा.फंड १३.६१ % (मालकचा हिस्सा) प्रशासकीय चार्जेस सह + सर्व्हीस टॅक्स १२.३६ % + कॉन्ट्रॅक्टर बरोबर झालेल्या करारातील अटी व शर्ती प्रमाणे व मा.उच्च न्यायालयाचे संबंधीत विषयावरील निर्णयास अधीन राहून सानुग्रह अनुदान ८.३३ % (दिपावली सणा निमित्त) याप्रमाणे रक्कम संबंधीत कंत्राटदारास आदा करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, श्री साईप्रसादालय)

---

**विषय नं.१३** **डॉ.राम शंकर महाजन (कंत्राटी सोनोलॉजिस्ट) यांना पुढील नेमणूक देणेबाबत.**

**प्रस्ताव-** डॉ.राम शंकर महाजन हे श्री साईनाथ रुग्णालयाकडे वैद्यकिय अधिकारी (सोनोलॉजिस्ट) या पदावर दि. २९/०४/१९९३ पासून कार्यरत होते. यांचे वयास दि. ३१/०८/२०१२ रोजी ६० वर्षे पूर्ण झाल्याने प्रचलीत सेवानियमांनुसार ते दि. ३१/०८/२०१२ चे माध्यान्होत्तर संस्थान सेवेतून निवृत्त झालेले आहेत. म्हणजेच त्यांची संस्थान सेवा १९ वर्षे झालेली आहे.

श्री साईनाथ रुग्णालयातील सोनोलॉजीस्टचे पद रिक्त झाल्याने जा.नं.२८३९ दि. १०/०९/२०१२ अन्वये डॉ. महाजन यांची दि. ०१/०९/२०१२ पासून दरमहा रु. ३५,०००/- एकत्रित मानधनावर सहा

महिन्यांसाठी कंत्राटी पध्दतीने नेमणूक केली होती. ती मुदत दि. २८/०२/२०१३ रोजी संपलेनंतर पुन्हा जा.नं. १४९५ दि. २८/०२/२०१३ अन्वये त्याच अटी शर्तीने त्यांची दि. ०१/०३/२०१३ पासून सहा महिन्यांसाठी कंत्राटी पध्दतीने नेमणूक केली होती. ती दि. ३१/०८/२०१३ रोजी संपुष्टात आली. त्यानंतर त्यांना जा.नं. २८३३ दि. ०३/०९/२०१३ अन्वये ११ महिने कालावधीसाठी अथवा जाहिरातीव्दारे सोनोलॉजीस्टची नेमणूक होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत पूर्वीच्याच अटी शर्तीवर नेमणूक देण्यात आली. त्यानुसार ते दि. ०६/०९/२०१४ रोजी कामावर हजर झालेले आहेत. त्यांच्या ११ महिने नेमणूकीचा कालावधी दि. ०५/०८/२०१४ अखेर संपुष्टात येत आहे. डॉ. महाजन यांनी दि. २७/०५/२०१४ रोजीचे अर्जाने पुन्हा सेवा देण्यास तयार असून दरमहा रु. ७०,०००/- मानधनाची मागणी केलेली आहे.

श्री साईनाथ रुग्णालयात स्त्री रोग विभाग व जनरल सर्जरी विभाग सुरु आहे. सदरचे विभाग सोनोग्राफी विभागावर अवलंबून असून दररोज सरासरी ३० ते ४० सोनोग्राफी होत आहेत. श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये सोनोग्राफी विभाग सुरु आहे. परंतु, ज्यू. रेडिओलॉजीस्ट उपलब्ध नाही.

मा. त्रिसदस्यीय समितीचे निर्णयांनुसार संस्थानचे दोन्ही रुग्णालयांकरीता आवश्यक पदे भरणेकामी दि. २६/१०/२०१३, दि. २६/११/२०१३ व दि. २८/११/२०१३ रोजीचे वर्तमान पत्रांमध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. जाहिरातीनुसार पात्र अर्जदार उमेदवारांच्या दि. ०१/०२/२०१४ रोजी मुलाखती घेण्यात आलेल्या आहेत. परंतु, मा. त्रिसदस्यीय समितीचे दि. १२/०४/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २७१ दि. ०१/०२/२०१४ रोजी झालेल्या मुलाखती रद्द करुन फेर जाहिरात प्रसिध्द करावी असा निर्णय झालेला आहे.

सदरचे निर्णयानुसार फेर जाहिरात देऊन पुढील प्रक्रिया पूर्ण होणेकरीता साधारणतः दोन ते तीन महिने कालावधी लागण्याची शक्यता आहे. तोपर्यंत रुग्णांची गैरसोय होऊन रुग्णालयाचे सोनोग्राफी संदर्भातील कामकाजावर परिणाम होऊ नये म्हणून नवीन सोनोलॉजीस्टची नेमणूक होईपर्यंत डॉ. महाजन यांना पुढील कंत्राटी नेमणूक देण्यात यावी, असे प्र. वैद्यकिय संचालक मागणी केली आहे.

दरम्यान दि. ०२/१२/२०१३ रोजी तत्कालीन मा. कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत असे ठरले की, डॉ. महाजन सोनोलॉजीस्ट यांना रु. ३५,०००/- मानधन देण्यात येत आहे. त्याऐवजी त्यांचा Last Pay Protect होईल अशा पध्दतीने मानधन देण्याचा प्रस्ताव सादर करावा. तसेच डॉ. म्हात्रे, न्यूरो सर्जन यांचे वेतनाबाबतचा प्रस्तावही सादर करण्यात यावा. त्यास अनुसरुन मा. त्रिसदस्यीय समितीचे दि. ०५/०६/२०१४ रोजीचे सभेत सदरचा प्रस्ताव सादर केला होता. त्यात निर्णय क्र. ३४६ अन्वये असे ठरले की, संस्थान रुग्णालयामधील इतरही तज्ञ वैद्यकिय अधिकाऱ्यांची वेतनवाढीची मागणी असल्यास त्याबाबतचा एकत्रित प्रस्ताव, डॉ. राम शंकर महाजन-सोनोलॉजीस्ट व डॉ. मयुर विलास म्हात्रे- न्यूरो सर्जन यांच्यासह सादर करण्यात यावा. परंतु अशा प्रकारे इतर तज्ञ वैद्यकिय अधिकाऱ्यांची वेतनवाढी मागणीचे अर्ज आलेले नाहीत.

डॉ. महाजन (कंत्राटी सोनोलॉजीस्ट) यांचा ११ महिने नेमणूकीचा कालावधी दि. ०५/०८/२०१४ रोजी संपुष्टात येत आहे. अशा परिस्थितीत त्यांना पुढील ११ महिने कालावधीसाठी अथवा जाहिरातीव्दारे नेमणूक होईपर्यंत या पैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत दरमहा रु. ५४,०००/- मानधनावर कंत्राटी सोनोलॉजीस्ट या पदावर नेमणूक देता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.६७३** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, सोनोलॉजीस्टची सेवा तातडीची वैद्यकिय सेवा असल्यामुळे व रुग्णांची गैरसोय होऊ नये याकरिता संस्थानला कंत्राटी कुशल/ अकुशल कर्मचारी पुरविणाऱ्या मे.बी.व्ही.जी. इंडिया लि., पुणे या कॉन्ट्रॅक्टरमार्फत डॉ.महाजन, सोनोलॉजीस्ट यांना दरमहा एकत्रित रु.५४,०००/- मात्र मानधनावर ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने कुशल कर्मचारी म्हणून नेमणूक देण्यात यावी.**

**तसेच, दरम्यानचे कालावधीत जाहिरात प्रक्रियेव्दारे सोनोलॉजीस्ट या पदावर उमेदवार उपलब्ध झाल्यास डॉ.महाजन यांना देण्यात आलेली नेमणूक संपुष्टात आणणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.१४** **श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयाकरीता वार्षिक लिनन खरेदीस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद- १७ -२(ण)

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.-प्रस्ताविक- मा.त्रिसदस्य समिती सभा दि.०८/१०/२०१३ नि.क्र.७२५ रोजीचे सभेत श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता लिनन खरेदीकामी येणा-या अंदाजे रु.४८,८७,९१६/- चे खर्चास,व सदरची खरेदी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन सिलबंद निविदा मागवुन खरेदीस मान्यता मिळालेली आहे.

तसेच सदरचे खरेदीस व खर्चास मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची दि.२६/०२/२०१४ रोजी मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयाकरीता लिनन खरेदीकामी संस्थानचे जनसंपर्क कार्यालयामार्फत आपला वार्ताहर-मुंबई, पुढारी-पुणे, पुण्यनगरी-औरंगाबाद, सार्वमत-अहमदनगर या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. सदरची ई निविदा महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in संकेतस्थळावर दि.१७/०३/२०१४ पासुन ठेवण्यात आली होती. तर ऑनलाईन निविदा स्विकारण्याची तारीख दि.२९/०३/२०१४ अखेर होती तर तांत्रिक निविदा स्विकारणेची तारीख दि.०१/०४/२०१४ अशी होती. त्यास अनुसरुन एकुण आठ सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

1. मे.खादी ग्रामोद्योग विकास समिती,दिल्ली
2. मे.कॉन्टॅक कंफोर्ट प्रा.लि.,अहमदनगर
3. मे.केसीएम इंटरनॅशनल,जयपुर
4. मे.राहुल ब्रदर्स,मुंबई,
5. मे.क्रिटीकल केअर सिस्टीम,पुणे
6. मे.तुलसी एम्पोरीयम,सोनई
7. मे.एम.बी.ट्रेडींग कंपनी,नाशिक
8. मे.सेवा मेडीकल अॅन्ड इक्वीपमेंट,पुणे

उपरोक्त आठ तांत्रिक निविदा हया दिनांक ०४/०४/२०१४ रोजी मा.वैदयकीय संचालक यांचे समक्ष उघडण्यात आल्या आहेत.

सदरहु प्राप्त तांत्रिक निविदा उघडल्यानंतर निविदेसोबत मागवलेल्या कागदपत्रांची छाणणी करण्यात आली होती त्यानुसार सर्व ८ हि निविदाधारकांनी सर्व कागदपत्रे सादर केलेली आहे व सर्व निविदा तांत्रिकदृष्टया पात्र आहेत.

तदनंतर सदरच्या आठ ई-कमर्शियल निविदा हया दि.१२/०६/२०१४ रोजी मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे उघडण्यात आल्या असुन त्याच दिवशी सदरहु निविदाधारकांना समिती सभेपुढे चर्चा/वाटाघाटीसाठी समक्ष बोलविण्यात आले होते, परंतु वेळेअभवी सदरहु निविदाधारकांशी चर्चा/वाटाघाटी होऊ शकल्या नाही.

तेव्हा दि.१२/०६/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४७२ अन्वये उपरोक्त विषयावर खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयाकरीता लिनन खरेदीकामी प्राप्त झालेल्या ई-कमर्शियल निविदा काही तांत्रिक कारणांमुळे उघडणेस विलंब झाल्यामुळे निविदेमधील दर समजु शकले नाही व वेळेअभावी निविदाधारकांशी चर्चा/ वाटाघाटी होऊ शकल्या नाहीत त्यामुळे उशीराने उघडल्या गेलेल्या निविदांच्या तुलनात्मक तक्त्यामधील निम्नतम दर व कापडाचा नमुना पाहून उपकार्यकारी अधिकारी व वैदयकीय संचालक यांनी अंतीम निर्णय घ्यावा असे ठरले."

त्यानुसार मा.उपकार्यकारी अधिकारी साहेब व वैदयकीय संचालक साहेब यांनी दि.२७/०६/२०१४ रोजी लिननचे नमुने रुग्णालयात समक्ष पाहिलेले आहे. तसेच दि.१४/०७/२०१४ रोजी मुख्यलेखाधिकारी साहेब यांचेशी चर्चा करुन त्यांना देखील वैदयकीय संचालक यांचेसमवेत लिननचे नमुने दाखविण्यात आले आहे.

हॉस्पिटलचे लिनन हे विविध ऑपरेशन थिएटरमध्ये,सर्जन,रुग्ण,व इतर पॅरामेडीकल कर्मचारी यांचेसाठी वापरले जाते ते दररोज लॉन्ड्रीमध्ये धुऊन संबंधीत विभागास दिले जाते ऑपरेशनिथएटरमध्ये वापरले जाणारे लिनन हे दररोज १३० डिग्री पर्यंत Autoclave केले जाते त्यामुळे धागे हे लवकर खराब होण्याची शक्यता असते त्यामुळे जेव्हा जेव्हा लिनन खरेदी करण्यात येते तेव्हा तेव्हा कापडाचा नमुना,मागील अनुभव व दर इत्यादीचा विचार करुन खरेदी करण्याची आता पर्यंतची कार्यपध्दती आहे.

मा.त्रिसदस्य समितीचे सभेतील दि.१२/०६/२०१४चे सभेतील निर्णय क्रमांक ५२६ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे. "संस्थानमध्ये विविध विभागांमधील विविध खरेदी/कामांसाठी दरपत्रके/कोटेशन्स/निविदा/ई-निविदा मागविणेत आल्यानंतर संबंधीतांना

सभेसमोर बोलावून चर्चा/वाटाघाटी करणेत येऊन,निम्नत्तम दरधारकास सदरचा कार्यादेश दिला जातो. परंतु या कार्यपध्दतीमध्ये निर्णय घेण्यास बराचसा कालावधी लागतो. तसेच त्या वस्तुचा/कामाचा दर्जा मिळत नाही.याकरीता यापुढे जाहिरातीमध्ये दरपत्रके/ कोटेशन्स, निविदा, ई-निविदा मागणी करताना" दरांबाबत चर्चा/वाटाघाटी केल्या जाणार नाहीत, आपण अंतीम दर दयावेत व निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार समितीला राहील." असा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.

त्यामुळे निविदाधारकांकडुन प्राप्त झालेला कापडाचा नमुना समक्ष पाहिल्यानंतर त्याठिकाणी कापडाचा नमुना मागणीप्रमाणे व कापडाचा पोत (Texture) मागील अनुभव इत्यादीचा विचार करीता तुलनात्मक दरातील एकुण ३५ प्रकारच्या लिननपैकी निम्नत्तम दर (Lowest 1) असलेले खालीलप्रकारचे लिनन घेण्यास हरकत नाही.

अ-

| अ.नं. | तपशील | मागणी संख्या नगात | निम्नत्तम पुरवठा धारकाचे नाव | निम्नत्तम दर Lowest 1 | एकुण किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | ओ.टी.स्टाफ ड्रेस | ११८९ | मे.केसीएम इंटरनॅशनल | २८६.६५ | ३४०८२६.८५ |
| २ | स्विपर ड्रेस | ४०० | मे.केसीएम इंटरनॅशनल | २८६.६५ | ११४६६०.०० |
| ३ | ओ.टी.असिस्टंट ड्रेस | ९८६ | मे.केसीएम इंटरनॅशनल | २८६.६५ | २८२६३६.९० |
| ४ | लिनन ट्रॉलीकव्हर | ११२ | मे.खादी ग्रामोदयोग विकास समिती | ६०.०० | ६७२०.०० |
| ५ | मॅकीनटॉश (रबर) | ७२६ | मे.राहुल ब्रदर्स | ८५.०० | ६१७१०.०० |
| ६ | पिडीयाट्रीक ड्रेस | १५२ | मे.तुलसी एम्पोरीयम | २१०.०० | ३१९२०.०० |
| ७ | स्ट्रेचर मॅट्रेस कव्हर | ५० | मे.एम.बी.ट्रेडींग कंपनी | ६०३.०० | ३०१५०.०० |
| ८ | पिलो प्रोटेक्टर | १५५ | मे.एम.बी.ट्रेडींग कंपनी | १८.०० | २७९०.०० |
| ९ | मास्क | ८६५ | मे.खादी ग्रामोदयोग विकास समिती | १०.५० | ९०८२.५० |
| १० | बिग शीट | ३२० | मे.खादी ग्रामोदयोग विकास समिती | १९९.५० | ६३८४०.०० |
| ११ | ट्रॉली कव्हर | ५०० | मे.खादी ग्रामोदयोग विकास समिती | ६०.०० | ३००००.०० |
| १२ | सी आर्म कव्हर | १० | मे.केसीएम इंटरनॅशनल | २६४.६० | २६४६.०० |
| १३ | ग्रीन क्लॉथ | १०००मी. | मे.खादी ग्रामोदयोग विकास समिती | ८०.०० | ८००००.०० |
| १४ | ब्ल्यु क्लॉथ | १००० मी. | मे.खादी ग्रामोदयोग विकास समिती | ७६.५० | ७६५००.०० |
| १५ | नॅपकीन | ५० | मे.राहुल ब्रदर्स | ३५.०० | १७५०.०० |
| १६ | स्मॉल ड्रॉशीट | ३००० | मे.खादी ग्रामोदयोग विकास समिती | ७९.८० | २३९४००.०० |
| १७ | पेशंट गाऊन | १०० | मे.क्रिटीकल केअर सिस्टीम | ११०.०० | ११०००.०० |
| १८ | आयशीट | २००० | मे.खादी ग्रामोदयोग विकास समिती | १८.५० | ३७०००.०० |
| १९ | पेशंट ब्लाऊज | ५०० | मे.एम.बी.ट्रेडींग कंपनी | १२६.०० | ६३०००.०० |
| २० | पेशंट पेटीकोट | ५०० | मे.एम.बी.ट्रेडींग कंपनी | १२६.०० | ६३०००.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २१ | फोम मॅट्रेस | ८३ | मे.एम.बी.ट्रेडींग कंपनी | ३८००.०० | ३१५४००.०० |
| २२ | फोम मॅट्रेस | १० | मे.कॉन्टॅक कंफोर्ट प्रा.लि. | २९७६.०० | २९७६०.०० |
| २३ | फोम पिलो | १०० | मे.खादी ग्रामोदयोग विकास समिती | २१६.०० | २१६००.०० |
| | | | | एकुण रु. | १९१५३९२.२५ |

तर खालील लिननसाठी Lowest-1 यांनी दिलेल्या कापडाचा नमुना समाधानकारक नसल्याने तो L-2 किंवा त्यापुढील पुरवठाधारकाकडुन खरेदी केल्यास चांगल्या प्रकारचे लिनन रुग्णालयास उपलब्ध होईल.<u>ब-</u>

| अ.नं. | तपशील | मागणी संख्या | पुरवठाधारकाचे नाव | निम्नत्तम क्रमांक | दर प्रती नग | L-1 व L-2 मधील फरक प्र.नग | L-1प्रमाणे येणारी एकुण रक्कम | L-2किंवा त्यानंतरंच्या दराप्रमाणे येणारी रक्कम | L-1 व L-2मधील एकुण खर्चाचा फरक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10=9-8 |
| १ | ड्रॉशीट | ३८१० | खादी ग्रामोदयोग | L-1 | १२३.९० | ५१.६१ | ४७२०५९.०० | | |
| | | | केसीएम इंटरनॅशनल | L-2 | १७५.५१ | | | ६६८६९३.१० | १९६६३४.१० |
| २ | होलशीट | २३८५ | खादी ग्रामोदयोग | L-1 | १३०.२० | ५५.८१ | ३१०५२७.०० | | |
| | | | केसीएम इंटरनॅशनल | L-2 | १८६.०१ | | | ४४३६३३.८५ | १३३१०६.८५ |
| 3 | होलशीट बीग | २०० | खादी ग्रामोदयोग | L-1 | १९९.५० | ७८.७५ | ३९९००.०० | | |
| | | | केसीएम इंटरनॅशनल | L-4 | २७८.२५ | | | ५५६५०.०० | १५७५०.०० |
| ४ | पेशंट ड्रेस | १५७५ | खादी ग्रामोदयोग | L-1 | २९९.२५ | ०९.४५ | ४७१३१८.७५ | | |
| | | | केसीएम इंटरनॅशनल | L-2 | ३०८.७० | | | ४८६२०२.५० | १४८८३.७५ |
| ५ | सर्जन ड्रेस | १११२ | तुलसी एम्पोरीयम | L-1 | २४०.०० | ४६.६५ | २६६८८०.०० | | |
| | | | केसीएम इंटरनॅशनल | L-2 | २८६.६५ | | | ३१८७५४.८० | ५१८७४.८० |
| ६ | सर्जन गाऊन | १९०० | खादी ग्रामोदयोग | L-1 | २१०.०० | २३.७३ | ३९९०००.०० | | |
| | | | केसीएम इंटरनॅशनल | L-2 | २३३.७३ | | | ४४४०८७.०० | ४५०८७.०० |
| ७ | सर्जन गाऊन-प्लॅस्टिक कोटेड | १३९५ | खादी ग्रामोदयोग | L-1 | २१०.०० | १४२.०० | २९२९५०.०० | | |
| | | | केसीएम इंटरनॅशनल | L-2 | ३५२.०० | | | ४९२१५६.०० | १९९२०६.०० |
| ८ | रॅप अराऊंड गाऊन | ७०० | खादी ग्रामोदयोग | L-1 | २४१.५० | ३१.९२ | १६९०५०.०० | | |
| | | | केसीएम इंटरनॅशनल | L-2 | २७३.४२ | | | १९१३९४.०० | २२३४४.०० |
| ९ | | १०५२ | राहुल ब्रदर्स | L-1 | २७०.०० | ३९.७५ | २८४०४०.०० | | |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | कलर बेडशीट | | केसीएम इंटरनॅशनल | L-2 80% | ३०९.७५ | | | ३२५८५७.०० | ४१८१७.०० |
| | | २६३ | राहुल ब्रदर्स | L-1 | २७०.०० | ९९.०० | ७१०१०.०० | | |
| | | | एम.बी.ट्रेडींग कंपनी | L-6 20% | ३६९.०० | | | ९७०४७.०० | २६०३७.०० |
| १० | कलर पिलोकवर | ५८९ | राहुल ब्रदर्स | L-1 | ६८.०० | २१.२५ | ४००५२.०० | | |
| | | | केसीएम इंटरनॅशनल | L-6 80% | ८९.२५ | | | ५२५६८.२५ | १२५१६.२५ |
| | | १४७ | राहुल ब्रदर्स | L-1 | ६८.०० | २२.०० | ९९९६.०० | | |
| | | | एम.बी.ट्रेडींग कंपनी | L-7 20% | ९०.०० | | | १३२३०.०० | ३२३४.०० |
| ११ | पडदे कापड | १००० मी. | खादी ग्रामोदयोग | L-1 | १०८.०० | १७.०० | १०८०००.०० | | |
| | | | तुलसी एम्पोरीयम | L-3 | १२५.०० | | | १२५०००.०० | १७०००.०० |
| | | | | | | एकुण रु. | २९३४७८२.७५ | ३७१४२७३.५० | ७७९४९०.७५ |

उपरोक्तपैकी अ.नं.९ मधील दोन्ही रुग्णालयाचे कलर बेडशीट हे एकुण १३१५ नगाची मागणी आहे व अ.नं.१० कलर पिलोकवर ७३६ नगाची मागणी आहे परंतु श्री साईबाबा रुग्णालयामध्ये SPR/Deluxe वॉर्ड मध्ये paid रुग्ण दाखल होत असतात त्यामध्ये बहुतेक उच्च शिक्षीत, अधिकारी /पदाधिकारी असतात तेथील बिलात कोणतीही सुट दिली जात नाही. तसेच तेथे इतर वॉर्डच्या तुलनेत वेगळया कलरचे बेडशीट वापरण्यात येतात तेव्हा वरील प्रस्तावात एकुण मागणीच्या २०% बेडशीट व २०% पिलोकवर सफेद रंगाचे तक्त्यातील दर L-6 नुसार घ्यावे असे नम्र मत आहे.

सदर मागणीतील अ.नं.२२ डोअर मॅट खरेदीकामी एकाच पुरवठाधारकांचे दर आले आहेत परंतु त्याचे दर व नमुना यामध्ये खुपच फरक असल्यामुळे सध्या ते खरेदी करण्याचे स्थगित ठेवलेले आहे.

1 - उपरोक्त "अ" प्रस्तावातील लिनन हे निम्नत्तम दराने (Lowest-1) व कापडाचा नमुना व पोत समाधानकारक असल्यामुळे त्यांचेकडुन खरेदी करता येईल, व याकामी एकुण खर्च रु.१९,१५,३९२.२५ येणार आहे.

2 प्रस्ताव "ब" मध्ये निम्नत्तम दर नाही परंतु कापडाचा नमुना हा समाधानकारक असल्याने त्यांचेकडुन घेतल्यास एकुण रु.३७,१४,२७३.५०/- इतका खर्च येणार आहे. प्रस्ताव "अ" व "ब" प्रमाणे खरेदी करावयाचे ठरले असुन याकामी रु.५६,२९,६६५.७५ खर्च येईल सदरचे खरेदीकामी अंदाजे खर्च रु.४८,८७,९१६/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

वरील प्रस्ताव १ व २ वर मा.त्रिसदस्य समितीचे आदेशानुसार योग्य ती कार्यवाही करता येईल. तरी सदरच्या प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.६७४ यावर सविस्तर चर्चा होऊन, सिव्हील ॲप्लीकेशन नं.१७७०/२०१४ वर दि.२६.०२.२०१४ चे आदेशान्वये रु.४८,८७,९१६/- मात्रचे खर्चास प्रस्तावीत कामी मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी मान्यता दिलेली आहे. प्रस्तावातील अ मध्ये नमुद लिनन खरेदीकामी निम्नतम दरधारकाच्या कापडाचा नमुना व पोत समाधानकारक असल्यामुळे त्यांचेकडून खरेदी करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच प्रस्तावातील ब मध्ये नमुद लिनन खरेदीकामी नमुने मागवून फेर निविदा विहित पध्दतीने मागविणेत याव्यात, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.१५ श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाकरिता Semi Automatic Rotary खरेदीकामी प्राप्त निविदा उघडून चर्चा/ वाटाघाटी करणे अथवा फेरनिविदा मागविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाने दि.१२/०६/२०१३ रोजीचे मागणीपत्रान्वये ०१ नग Semi Automatic Rotary Microtome ची मागणी केलेली आहे. सध्या त्यांचेकडे असलेले Microtome हे सन २००६ साली M/s. Sanjay Scientific Co., Mumbai यांचेकडुन रक्कम रु. १९६४२/- इतक्या रक्कमेत खरेदी केलेले असून ते व्यवस्थित काम देत नाही, तसेच कंपनीने त्यांचे Production बंद केलेले असून दुरुस्तीसाठी त्यांचे स्पेअर्स पार्टस् देखील उपलब्ध होत नाही. सध्या

त्यांचेकडे असलेले मशिन हे Mannual असल्यामुळे Testing साठी वेळ लागतो व Proper Output मिळत नाही. तसेच सध्या रुग्णालयात पेशंटची संख्या वाढत आहे, त्यामुळे त्यांनी नवीन Semi Automatic Rotary Microtome ची मागणी केलेली आहे.

उपरोक्त Semi Automatic Rotary Microtome खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी M/s. Labcon Scientific Instruments Pvt. Ltd., Mumbai यांचेकडुन दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यांनी दि.२७/०६/२०१३ रोजीचे दरपत्रकानुसार खालीलप्रमाणे दर कळविलेले आहे.

| Sr. No. | Description | Qty. | App. Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1. | Semi Automatic Rotary Microtome | 01 Nos. | 825525.00 | 825525.00 |
| | | | Total Amt. in Rs. | 825525.00 |

दि.१४/११/२०१३ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेत निर्णय क्र.९०० अन्वये वरील मागणीप्रमाणे Semi Automatic Rotary Microtome ०१ नग विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन सिलबंद निविदा मागवुन खरेदीस व याकामी येणाऱ्या रक्कम रु. ८२५५२५/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरच्या खरेदीची रक्कम जास्त असल्याने जास्तीत जास्त प्रतिसाद मिळणेकामी सदरची जाहिरात देशदुत-अहमदनगर, युवा वार्ता- संगमनेर, लोकमंथन- नाशिक या वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्यात आली होती, तसेच संस्थाचे संकेत स्थळावर देखील निविदा देण्यात आली होती.

निविदा विक्रीची मुदत दि.०१/०२/२०१४ ते १५/०२/२०१४ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.१८/०२/२०१४ अखेर ठेवण्यात आली होती. तसेच एकूण १२ उत्पादक कंपन्या / पुरवठा धारक यांना इकडील पत्र क्र.७००५ दि. २९/०१/२०१४ अन्वये जाहिराती बाबत अवगत करणेकामी पत्र पाठविण्यात आले होते.

त्यास अनुसरुन मुंबई कार्यालयात ०२ निविदा प्राप्त झालेल्या आहे, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | Labcon Scientific Instrument Pvt. Ltd., Mumbai | 17/02/2014 |
| 2 | Leica /micro systems, Mumbai | 18/02/2014 |

**अ)** तेव्हा उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या ०२ सिलबंद निविदा मा. त्रिसदस्य समिती सभेपुढे समक्ष उघडून त्याच दिवशी निविदाधारकांना चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविण्याचा प्रस्ताव मा. त्रिसदस्य समिती सभेपुढे ठेवण्यास मान्यतेसाठी ठेवण्यात यावा.

**किंवा**

**ब)** या कामी फेर निविदा मागवणेचा प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीपुढे ठेवावा.

वरीलप्रमाणे अ किंवा ब या प्रस्तावावर निर्णय होणेसाठी सदर प्रस्ताव दि. १२/०४/२०१४ रोजीचे मा. त्रिसदस्य समितीपुढे सादर करण्यात आला होता. यावर निर्णय होऊन सदरचे खरेदीकामी वर्तमापत्रात फेर जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात असे निर्णय क्रमांक **२७८** अवये ठरले होते. त्याुसार सदरचे खरेदीकामी सार्वमत - अहमदागर, देशदूत - नाशिक या वर्तमानपत्रात फेर जाहिरात देऊन दि. १२/०५/२०१४ ते दि. २४/०५/२०१४ पर्यंत निविदा विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या. तर निविदा स्वीकारण्याची अंतिम मुदत दि. २७/०५/२०१४ अखेर ठेवण्यात आली होती. तसेच एकूण १२ अधिकृत विक्रेते/ पुरवठाधारक यांना इकडील पत्र क्र. ७६४ दि. ०६/०५/२०१४ अवये जाहिरातीबाबत अवगत करणेकामी पत्र पाठविण्यात आले होते परंतु फेर जाहिरातीस आुसरुन देखील एकही निविदा प्राप्त झालेली नाही त्यामुळे सदरचे खरेदीकामी प्रथम जाहिरातीस अनुसरुन दोनच निविदा प्राप्त झालेल्या आहे. तेव्हा

**अ)** उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या ०२ सिलबंद निविदा मा. त्रिसदस्य समिती सभेपुढे समक्ष उघडून त्याच दिवशी निविदाधारकांना चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्याचा प्रस्ताव मा. त्रिसदस्य समिती सभेपुढे ठेवण्यास मान्यतेसाठी ठेवण्यात यावा.

**किंवा**

**ब)** या कामी पुन्हा तिसऱ्यांदा निविदा मागवणेचा प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीपुढे ठेवावा.

तरी उपरोक्त पैकी अ **किंवा** ब या प्रस्तावावर निर्णय होणेसाठी मान्यता असावी.

**निर्णय क्र.६७५ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाकरिता Semi Automatic Rotary खरेदी करणेसाठी दोनच निविदा प्राप्त झालेल्या असल्यामुळे जास्त उत्पादक यावेत म्हणून याकामी फेरनिविदा मागविणेत याव्यात, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०१** **विश्वस्तांच्या सुचनांबाबत.**
**निर्णय क्र.६७६** **मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-**

**(१)** पुर्वीच्या व्यवस्थापन समितीने मान्यता दिलेल्या व मा. खंडपीठाची मान्यता मिळालेल्या खर्चा व्यतिरिक्त साईभक्तांना, रुग्णांना सेवा देण्यात येत असलेल्या सोयी- सुविधा करीता आवश्यक असणाऱ्या सर्व सेवांसाठी लागणारी सर्व मशिनरी/ उपकरणे व तत्सम यांत्रिक सर्व बाबी यांची AMC, CAMC, इतर दुरुस्ती यासाठी येणारा खर्च तसेच मालमत्ता कर, रेग्युलर टॅक्सेस, कायदेशीर जबाबदारीने भरावयाच्या रक्कमा यांसारखे रक्कम रु.१ कोटी पर्यंतचे खर्च मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचे मान्यतेमधून वगळणेत यावेत. (कार्यवाही- सर्व विभागप्रमुख)

---

वरील निर्णय क्र.६६१ ते ६७६ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर सायंकाळी ०५.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| (कुंदनकुमार सोनवणे) | (अनिल कवडे) | (शशिकांत कुलकर्णी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी